**शेतक-यांच्या थकित कर्जमाफीच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांना मासिक पारिश्रमिकाची रक्कम मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन आदेश क्रमांक सववि-१०१७/प्र. क्र.२१८/आस्था-१**
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक १४ सप्टेबर, २०१७.

वाचा :- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ८/१/२०१६
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७/१२/२०१६
३) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक सववि १०१७/प्र.क्र.२१८/आस्था १, दिनांक २१/६/२०१७

**शासन आदेश:-**

सामान्य प्रशासन विभागाच्या दि ८/१/२०१६ च्या शासननिर्णयास अनुसरून, शासनामार्फत घेण्यात आलेल्या शेतक-यांच्या थकित कर्जमाफीच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सदरच्या कामाची तिव्रता आणि कामाचे विशिष्ट स्वरूप विचारात घेता, तसेच कालमर्यादेतच तातडीने याबाबतची कार्यवाही करावयाची असल्यामुळे अनुभवी व योग्य अधिकारी उपलब्ध व्हावे म्हणून साप्रविच्या दिनांक ८/१/२०१६ च्या शासननिर्णयामधील अटींची पूर्तता करणा-या सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था कार्यालयातील सेवानिवृत्त झालेल्या खालील दोन अधिकारी यांची दिनांक २१/६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये ६ महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात आली आहे.

१) श्री. एस. बी. पाटील, सेवानिवृत्त सह सचिव तथा अप्पर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
२) श्री. धरणीधर पाटील, सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था

२. सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १७/१२/२०१६ च्या शासननिर्णयान्वये दिनांक ८/१/२०१६ चा शासननिर्णय अधिक्रमित केला असून दिनांक ८/१/२०१६ च्या शासननिर्णयामधील तरतूदीस करार पध्दतीने करण्यात आलेल्या नियुक्त्यांना देखील दिनांक १७/१२/२०१६ च्या शासननिर्णयातील तरतूदी दिनांक १७/१२/२०१६ पासून लागू होणार असल्यामुळे करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उपरोक्त सेवानिवृत्त अधिका-यांच्या पारिश्रमिकाची परिगणना दिनांक १७/१२/२०१६ च्या शासननिर्णयामधील तरतूदीनुसार करण्यात येत असून सदर सेवानिवृत्त अधिका-यांना दिनांक १७/१२/२०१६ पासून सुधारीत पारिश्रमिक २५% भत्त्यासह अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६ च्या शासननिर्णयातील तरतूदीनुसार सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक २१/६/२०१७ च्या शासन निर्णयानुसार कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सुधारीत मासिक पारिश्रमिकाची व भत्त्याची रक्कम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत असून त्याची तपशीलवार परिगणना सोबत जोडलेल्या परिशिष्ट"अ" मध्ये नमूद करण्यात आली आहे.

| अ.क्र | सेवानिवृत्त अधिकारी यांचे नाव व पदनाम | भत्त्यासह सुधारीत मासिक पारिश्रमिक |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १) | श्री. एस. बी. पाटील, सेवानिवृत्त सह सचिव तथा अप्पर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था | रु.६०१२५/- |
| २) | श्री. धरणीधर भाऊसाहेब पाटील, सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,पुणे | रु. ४२५००/- |

४. उपरोक्त मासिक पारिश्रमिक सदर सेवानिवृत्त अधिका-यांच्या करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कालावधीसाठी लागू राहील.

५. करार कालावधीत उपरोक्त सेवानिवृत्त अधिका-यांच्या पारिश्रमिकाचा खर्च “ मागणी क्रमांक व्ही २, ३४५१, सचिवालयीन आर्थिक सेवा (०१) (०१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग ३४५१०३०४ (योजनेतर) १३ कार्यालयीन खर्च “ या लेखाशिर्षाखालील उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७०९१४१३००२९८७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing Tax Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d09609003b414273f73, cn=Sudin Gaikwad
Date: 2017.09.14 12:51:26 +05'30'

**( डॉ सुदिन गायकवाड )**

उप सचिव , महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव ,मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्यसचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. मा. विधान सभा सदस्य/विधानपरिषद सदस्य (सर्व)
५. अपर मुख्य सचिव ( सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव ( पणन ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) , महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
९. महालेखापाल ( लेखापरीक्षा ), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

११.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई (२ प्रती)
१२.सामान्य प्रशासन विभाग ( १३ ), मंत्रालय, मुंबई
१३.श्री. एस. बी. पाटील, सेवानिवृत्त सह सचिव तथा अप्पर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४.श्री. धरणीधर भाऊसाहेब पाटील, सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५.सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.कक्ष अधिकारी ( रोखशाखा ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मत्रालय, मुंबई
१७.निवड नस्ती आस्था-१

शेतक-यांच्या थकित कर्जमाफीच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सुधारीत मासिक पारिश्रमिकाची व भत्त्याची सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६ च्या शासननिर्णयास अनुसरून परिगणना-

**शासननिर्णय क्रमांक सववि १०१७/प्र.क्र.२१८/आस्था १, दिनांक १४ सप्टेबर, २०१७ सोबतचे परिशिष्ट अ**

| करार पध्दतीने नियुक्त अधिकारी यांचे नाव व पदनाम | श्री. एस. बी. पाटील, सेवानिवृत्त सह सचिव तथा अप्पर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था | श्री. धरणीधर भाऊसाहेब पाटील, सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे |
|---|---|---|
| निवृत्तीचा दिनांक | दिनांक ३१/३/२०१३ | दिनांक ३१/८/२०१६ |
| निश्चित झालेले मूळ निवृत्तीवेतन | रु. २६,००५/- | रु. १८४३०/- |
| अंशराशीकृत मूल्य | रु. १०,४०२/- | रु.७३७२/- |
| करार पध्दतीने नियुक्तीचा दिनांक | दिनांक २१/६/२०१७ | दिनांक २१/६/२०१७ |
| नियुक्तीच्या वेळी प्राप्त होणा-या निवृत्तीवेतनाची रक्कम+महागाई भत्ता | १५६०३+३२५०६<br>(मूळ निवृत्तीवेतनावरील १२५% जून, २०१७ चा महागाई भत्ता= रु.४८१०९/- | ११०५८+२३०३७<br>(मूळ निवृत्तीवेतनावरील १२५% जून, २०१७ चा महागाई भत्ता= ३४०९५/- |
| मासिक पारिश्रमिकाची रक्कम | रु. ४८१००/-<br>(शंभरात रूपांतरीत) | रु. ३४०००/-<br>(शंभरात रूपांतरीत) |
| निवास भत्ता, प्रवासभत्ता आणि दुरध्वनी भत्ता या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय रक्कम<br>( मासिक पारिश्रमिकाच्या २५%) | रु. १२०२५/-<br>(रु.४८१०० च्या २५%) | रु. ८५००/-<br>(रु.३४००० च्या २५%) |
| एकूण मासिक वित्तलब्धी | रु.६०१२५/- | रु. ४२५००/- |
| | (दिनांक २३/६/२०१७ पासून अनुज्ञेय) | (दिनांक १/७/२०१७ पासून अनुज्ञेय) |